फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ५१८/२०१७ निशाणी क्र.

**अर्जदार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची साक्ष,**

**अर्जदार पक्षातर्फे विधीज्ञ श्रीमती हळ्ळीकर यांच्यामार्फत साक्षिदाराचा पुढील सर तपास शपथेवर सुरू**

१२. माझ्या सर तपासाच्या शपथपत्रातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी स्वाक्षरी आहे. तो मला मान्य आहे.

पुढील सर तपास संपला.

**गैरअर्जदार पक्षातर्फे विधीज्ञ श्री. झेड. के. जागीरदार यांच्यामार्फत साक्षिदाराचा उलट तपास**

१३. माझे शिक्षण इयत्ता ८ वी पर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमचा विवाह लातूर येथे झालेला आहे. माझे पती हे माझ्या जवळून नात्यातील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती हे दारु पीत नाहीत तसेच मोलमजुरी करुन चांगले जीवन जगत आहेत म्हणून माझे लग्न त्यांच्या बरोबर जमवले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे आई–वडील व भाऊ हे सर्वजण परभणी येथे राहतात. हे म्हणणे खरे नाही की, मी कधीही पती बरोबर उदगीर येथे राहिलेले नाही.

१४. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या लग्नाचा सर्व खर्च हा गैरअर्जदारांनी केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या लग्नात माझ्या आई–वडिलांनी लग्नात काहीही दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सर तपासाच्या परिच्छेद क्र.१ मधील संपूर्ण मजकूर हा खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारांनी मला कधीही कोणत्याही प्रकारचा त्रास दिलेला नाही.

१५. हे म्हणणे खरे नाही की, माझी २ नंबरची मुलगी २ महिन्यांची असताना मी गैरअर्जदाराबरोबर भांडण करुन त्या लहान मुलीला त्यांच्याकडेच ठेवून निघून गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हापासून प्रस्तुत अर्ज दाखल करेपर्यंत मी मुलांना देखील पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या २ बहिणी हैदराबाद येथे राहतात. त्यापूर्वी त्या परभणी येथे राहत होत्या. मी गेल्या अडीच वर्षांपासून हैदराबाद येथे राहत आहे.

१६. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बहिणी व भाऊ माझ्या संसारात ढवळाढवळ करुन मला गैरअर्जदारापासून वेगळे करत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी लहान सहान गोष्टींवरुन गैरअर्जदाराबरोबर भांडण करुन लेकरं त्यांच्याकडे सोडून माहेरी निघून जात असे. हे म्हणणे खरे नाही की, मी वेळोवेळी गैरअर्जदाराकडे घटस्फोटाची मागणी करत असे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारावर त्याच्या बहिणींची व आईची जबाबदारी आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदाराने बहिणीच्या लग्नाबद्दल थोडीही हालचाल केली की, मी त्याच्याशी भांडण

करत असे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत अर्ज दाखल करतेवेळी माझे २ मुलं शाळेत जात होते. हे म्हणणे खरे नाही की, मी जोपर्यंत गैरअर्जदाराकडे नांदले तोपर्यंत त्यांनी मला चांगले सांभाळले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत अर्ज दाखल केल्यानंतरही मी गैरअर्जदाराकडे ४–५ वर्ष नांदलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळेच मी प्रस्तुत अर्ज दाखल केल्यानंतर थेट २०२३ मध्येच प्रस्तुत अर्ज पुढे चालू केला.

१७. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदाराने माझ्याकडे कधीही पैशांची मागणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार व त्याच्या नातेवाईकांनी माझा कधीही कौटुंबीक छळ केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार हा सेंट्रींग मिस्त्री काम करत असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार हा बांधकामवर रोजंदारीने काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदाराचे उत्पन्नाबाबत खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी सासूबाई सतत आजारी असते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारावर त्याच्या वयोवृद्ध आईच्या पालनपोषणाची जबाबदारी आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या त्रासाला कंटाळून गैरअर्जदाराने दुसरा विवाह केलेला आहे.

प्रश्न – गैरअर्जदार आज देखील तुम्हाला मुलाबाळांसह नांदायला घेऊन जायला तयार आहे, तुमचे काय म्हणणे आहे.

उत्तर – यापूर्वी देखील असेच बोलून घेऊन गेले होते. परंतु ते चांगले वागवत नाहीत. त्यांचे दुसरे लग्न झालेले आहे, त्यांच्यापासून मला धोका आहे.

१८. हे म्हणणे खरे नाही की, मी हैदराबाद येथे चांगल्या पगाराच्या नोकरीवर काम करते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार यांची मला पोटगी देण्याची ऐपत नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ गैरअर्जदाराकडून पैसे उकळण्यासाठी मी प्रस्तुत खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतःहून गैरअर्जदाराचा त्याग केलेला असल्याने मला पोटगी मागण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सर तपासातील संपूर्ण मजकूर हा खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र देऊन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला. फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती.

Digitally signed by BHALCHANDRA RAWSAHEB ZENDE
Date: 2026.04.24 17:28:43 +0530

(भालचंद्र रा. झेंडे)

दिनांक : २४.०४.२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्या.क्र.३), उदगीर.